चंद्रपूर जिल्हा पोलीस वार्तापत्र

कार्यालय पोलीस अधीक्षक, चंद्रपूर

१५ एप्रिल, २०१९



☎ : 07172-264300

: 07172-255800

Email : sp.chandrapur@gmail.com, sp.chandrapur@mahapolice.gov.in

: 7276494810 (PRO)


# दुर्गापुर पोलीसांची विशेष कार्यवाही

## घरफोडी करणा—या आरोपीस मुद्‌देमालासह २४ तासात केले अटक.

दिनांक १६/०४/२०१९ रोजी हनुमान नगर चर्च रोड तुकूम येथे राहणारे आशिष बबनराव मोरे हे नागपुर येथे त्यांच्या नातेसंबधातील विवाह सोहळयास सहपरीवार गेलेले होते. अचानक दुस—या दिवशी सकाळी चंद्रपुर येथील त्यांच्या घराशेजा—यांचा त्यांना फोन आला की त्यांचे घरी चोरी झालेली आहे. ते लगेच परत आले तेव्हा त्यांच्या निदर्शनास आले की, चोरटयाने बाहेरील फाटकाचे कुलूप व मुख्य दरवाजाच्या खिडकिचे लोखंडी जाळी तोडुन घरात प्रवेश केला व घरातील नगदी ५,००० रू. व बाहेर ठेवलेली होन्डा एव्हीएटर कंपनीची मोटर सायकल किंमत अंदाजे ५०,००० रू असा एकुण ५५,००० रू. चा माल चोरून नेला. त्यांनी लेगच पोलीस स्टेशन दुर्गापुर गाठुन कलम ४५७, ३८० भादवी अन्वये आपली तक्रार नोंदवीली.

पोलीस स्टेशन दुर्गापुर येथे तक्रार प्राप्त होताच प्रभारी अधिकारी यांच्या मार्गदर्शनात पोउनी गणेश झांबरे व कर्मचारी यांचे एक पथक गठित करून घटनास्थळावर रवाना करण्यात आले. दि. १८/०४/२०१९ रोजी पथकाव्दारे करण्यात आलेल्या तपासावरून व गोपनिय माहितीच्या आधारावर समता नगर, उर्जानगर वार्ड क्र. ०६ येथील १) ज्ञानदिप उर्फ दिपक चंद्रभान बोरकर वय २२ वर्ष. व त्याचा मित्र २) विधी संघर्षग्रस्तबालक यास ताब्यात घेतले व कसुन चौकशी केली असता त्यानी गुन्हयाची कबुली दिली. पोलीस पथकाने दोन्ही आरोपीस चोरलेल्या मुद्‌देमालासह २४ तासाच्या आत ताब्यात घेतले.

सदरची कार्यवाही पोलीस अधीक्षक श्री. महेश्वर रेड्‌डी चंद्रपुर यांचे मार्गदर्शनात, पोलीस स्टेशन दुर्गापुर पोनि. श्री. दिपक खोब्रागडे यांचे नेतृत्वात पोउपनि. गणेश झांबरे, पोहवा. सुनिल गौरकर, अशोक मंजुळकर, रजनिकांत पुठ्ठावार, नापोशि उमेश वाघमारे, सुनिल मैश्राम, पोशि संतोष आडे यांनी पार पाडली.

———————————————————————————————————————